आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२० ऑक्टोबर २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाच्या तिन्ही सैन्यदलांमधल्या अतुलनीय समन्वयामुळे ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानला शरणागती पत्करावी लागली, असं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन / आयएनएस विक्रांतवर नौदलाच्या जवानांसोबत साजरी केली दिवाळी

- दिवाळीच्या सणाचा सर्वत्र उत्साह, शेअर बाजारातही तेजी

- राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत महाराष्ट्राला केंद्र सरकारकडून १ हजार ५६६ कोटी ४० लाख रुपये निधी मंजूर

**आणि**

- राज्याचे माजी अर्थमंत्री महादेव शिवणकर यांच्या पार्थिवावर उद्या अंत्यसंस्कार

**<><><><><>**

देशाच्या तिन्ही सैन्यदलांमधल्या अतुलनीय समन्वयामुळे ऑपरेशन सिंदूरदरम्यान पाकिस्तानला शरणागती पत्करावी लागली, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. गोवा आणि कारवारच्या किनाऱ्यापासून जवळच नांगरलेल्या आयएनएस विक्रांत या युद्धनौकेवर नौदलाच्या जवानांसोबत प्रधानमंत्र्यांनी दिवाळी साजरी केली, त्यावेळी ते बोलत होते. आयएनएस विक्रांत ही युद्धनौका म्हणजे आत्मनिर्भर भारत आणि मेड इन इंडिया उपक्रमाचं प्रतीक आहे. ही केवळ एक युद्धनौका नाही, तर २१ शतकातल्या भारताच्या परिश्रम, प्रतिभा आणि वचनबद्धतेचंही प्रतीक आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले.

गेल्या दशकभरात भारतीय सेना आत्मनिर्भरतेकडे मार्गक्रमण करत आहे. या काळात ४० पेक्षा जास्त युद्धनौका आणि पाणबुड्या नौदलात दाखल झाल्या असून स्वदेशीवर भर दिला जात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. गेल्या दशकभरात संरक्षण उत्पादनात तीनपट वाढ झाली आहे, तिन्ही सेनादलांसाठी शस्त्र आणि

उपकरणांचं उत्पादन देशातच करण्यावर भर दिला जात असून भारत शस्त्रास्त्र निर्यातीत जगातला आघाडीचा देश बनेल असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.

***होल्ड... बाईट मोदी***

जवानांसोबत दिवाळी साजरी करणं आपल्यासाठी आनंदाची बाब असल्याचं सांगत प्रधानमंत्री मोदी यांनी नौदल जवानांना मिठाईचं वाटप केलं. तसंच सैन्यदलाच्या सामर्थ्याचा गौरव केला. काल संध्याकाळी विक्रांतवर आयोजित बडा खाना भोजनसमारंभात प्रधानमंत्री सहभागी झाले होते.

**<><><><><>**

दीपावलीचा सण सर्वत्र उत्साहाने साजरा होत आहे. राज्यात आज नरकचतुर्दशीनिमित्त घरोघरी चंद्रोदयापूर्वी अभ्यंगस्नान करुन, फटाके फोडून आणि दिवाळीचा फराळ करुन सर्वांनी सणाचा आनंद लुटला. घरोघरी विविध आकारांचे आकाशकंदील आणि मनमोहक रांगोळ्या सर्वांचं लक्ष वेधून घेत होते. दिवाळी पहाटेनिमित्त शास्त्रीय संगीताच्या मैफिलींचं आयोजन ठिकठिकाणी करण्यात आलं होतं. राज्य सांस्कृतिक संचालनालयातर्फेही मुंबईत विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात झाडगाव इथं नरकचतुर्दशीनिमित्त १८ फुटी नरकासुराचं दहन करण्यात आलं. राज्याच्या काही भागात यंदा दिवाळीवर पूर आणि अतिवृष्टीचं सावट आहे. त्यादृष्टीने आपद्ग्रस्तांसाठी मदतीचे उपक्रमही दिवाळीनिमित्त राबवले जात आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी दिवाळीनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. दीपावलीचा हा सण अंध:कारावर प्रकाशाच्या, अज्ञानावर ज्ञानाच्या आणि अर्धमावर धर्माच्या विजयाचं प्रतीक आहे. देशाच्या विविध भागांमध्ये उत्साहानं साजरा केला जाणारा हा सण प्रेम आणि बंधुत्वाचा संदेश देतो, असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

प्रकाशाच्या या उत्सवाने आपल्या सर्वांचं जीवन सलोखा, आनंद आणि समृद्धीने उजळून निघावं, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिवाळी शुभेच्छा देताना म्हटलं आहे. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन तसंच माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी आज राष्ट्रपती भवनात जाऊन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि शुभेच्छा दिल्या.

<><><><><>

राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी राज्यातल्या जनतेला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

दिवाळीचा हा सण सर्वांच्या जीवनात सुख, शांती, समृद्धी आणि प्रकाश घेऊन येवो, असं राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. या सणाच्या निमित्तानं स्वदेशीचा अंगिकार करण्याचं आवाहनही त्यांनी केलं आहे.

हा सण प्रत्येकाच्या जीवनात नव्या आशा, नव्या संधी आणि समाधान घेऊन येवो असं अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यातल्या पूरग्रस्तांचं तसंच पुरानं बाधित शेतकऱ्यांचं जीवन पुन्हा उजळवण्यासाठी सर्वांनी एकदिलानं प्रयत्न करुया, असं आवाहनही त्यांनी केलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही सर्वांच्या इच्छा पूर्ण होवोत अशी कामना करत दिवाळी सणाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

दिवाळीच्या दिवशी भारतीय शेअर बाजारांमध्ये तेजी दिसून आली. आज आठवड्याच्या सुरुवातीलाच सेन्सेक्स ४११ अंकांची वाढ नोंदवत ८४ हजार ३६३ अंकांवर बंद झाला. सेन्सेक्समध्ये नोंदवलेल्या ३० पैकी १९ कंपन्यांनी वाढ नोंदवली आहे. यात बँका, गुंतवणूक तसंच खासगी क्षेत्रातल्या कंपन्यांचा समावेश आहे. जवळपास अडीच हजारांहून अधिक कंपन्यांचे समभाग आज वधारले.

लक्ष्मीपूजनानिमित्त उद्या मुंबईच्या शेअर बाजारांमधे मुहूर्ताचे सौदे दुपारी पावणे दोन ते पावणेतीन या वेळात होणार आहेत.

<><><><>

दिवाळीचा आनंद साजरा करताना विजेची रोषणाई तसंच फटाक्यांची आतषबाजी करताना सुरक्षिततेला प्राधान्य देणं आवश्यक असून  सार्वजनिक वीज यंत्रणेबरोबरच घरगुती रोषणाईच्या उपकरणांपासून सावध राहावं असं आवाहन महावितरणने केलं आहे.

<><><><>

राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत चालू आर्थिक वर्षात केंद्र सरकारच्या वाट्याचा दुसरा हप्ता महाराष्ट्राला मंजूर झाला आहे. यामुळे यंदाच्या मान्सून काळात अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळं बाधित झालेल्यांना तात्काळ मदत देण्यासाठी आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी १ हजार ५६६ कोटी ४० लाख रुपये निधी महाराष्ट्राला मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल समाज माध्यमावरून ही माहिती दिली. या मदतीसाठी त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले. ही अग्रिम मदत असून अंतिम मदत प्राप्त करण्यासंदर्भातली प्रक्रिया अजून सुरू असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

<><><><>

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज विकसित महाराष्ट्र २०४७ सल्लागार समितीची बैठक झाली. या बैठकीत विकसित महाराष्ट्र २०४७ मसुद्याला मान्यता दिली गेली. आता हा मसुदा मान्यतेसाठी मंत्रिमंडळासमोर ठेवला जाणार आहे. या मसुद्याअंतर्गत २०२९, २०३५ आणि २०४७ पर्यंत अशा तीन टप्प्यात विकसित महाराष्ट्राचं ध्येय गाठण्यासाठीचा मार्गदर्शक आराखडा मांडला आहे.

या मसुद्याच्या अनुषंगानं यापुढे मंजुरी आणि कार्यवाहीकरता सर्व संबंधित यंत्रणा आणि विभागांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची सूचनाही त्यांनी केली.

या मसुद्याच्या निर्मितीसाठी नागरिकांनी दिलेल्या सूचनांबद्दलही मुख्यमंत्र्यांनी आभार व्यक्त केले. या बैठकीला विविध विभागांचे मंत्री आणि अधिकारी उपस्थित होते.

**<><><><><>**

राज्यातल्या विविध आरोग्यविषयक योजनांची अंमलबजावणी एकाच छताखाली प्रभावीपणे करण्याच्या दृष्टीने शासन वॉर रूम स्थापन करणार आहे. हा विशेष कक्ष मुख्यमंत्री सहायता निधी आणि धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या देखरेखीखाली काम करणार असून अध्यक्षपदी सेवानिवृत्त आयए एस अधिकारी प्रवीण परदेशी यांची नियुक्ती झाली आहे.

एकाचवेळी एकापेक्षा जास्त योजनांचा लाभ एका रुग्णाकडून घेतला जाण्याचे प्रकार रोखण्याच्या दृष्टीनं हे पाऊल उचललं असून राज्य आणि केंद्रसरकारच्या सर्व आरोग्य योजनांविषयी माहिती, मार्गदर्शन आणि मदत मिळावी याकरता १८०० १२३ २२११ हा दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**<><><><><>**

राज्याचे माजी अर्थमंत्री महादेव शिवणकर यांचं आज गोंदिया जिल्ह्यातल्या आमगाव इथं वार्धक्यानं निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या सरकारमध्ये त्यांनी अर्थ खात्याची, तसंच पाटबंधारे विभागाची जबाबदारी सांभाळली होती. आमगाव विधानसभा मतदारसंघातून ते पाच वेळा निवडून आले होते, तसंच चिमूर मतदारसंघातून एकदा लोकसभेवरही निवडून गेले होते. गोंदिया जिल्हा निर्मितीत त्यांचं महत्त्वाचं योगदान होतं. त्यांच्या पार्थिवावर

उद्या सकाळी १० वाजता आमगावातल्या साकरीटोला घाटावर अंत्यसंस्कार होणार आहेत.

**<><><><><>**

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी कोकण रेल्वेच्या लांब पल्ल्याच्या ४ गाड्यांपैकी २ गाड्यांना  सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या सिंधुदुर्ग इथं तर २ गाड्यांना कणकवली रेल्वे स्थानकांवर थांबा देण्याची मागणी मान्य केली आहे. याबाबत रेल्वे बोर्डानं परिपत्रकही जारी केलं आहे. त्यानुसार एर्नाकुलम - हजरत निजामुद्दीन एक्सप्रेस तसंच  एर्नाकुलम - अजमेर मरुसागर एक्सप्रेस या गाड्या सिंधुदुर्ग स्थानकावर तर हिसार - कोयंबतूर एक्सप्रेस आणि गांधीधाम - नागरकोइल एक्सप्रेस या दोन गाड्या कणकवली  स्थानकावर थांबणार आहेत.

**<><><><><>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात पुढचे दोन दिवस तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याचा अंदाजही हवामान विभागाने वर्तवला आहे.

**//<><><><><>//**